**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – विलास गोविंद गवंडे
माझे वय – ६६ वर्षे,
व्यवसाय – सेवानिवृत्त, निमतानदार
रा – मळगाव, ता.सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर वादीचे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत.</u>**

०१. जून २०१३ ते जूलै २०१५ पर्यंत मी मालवण येथे निमतानदार म्हणून काम करत होतो. मी कार्यालयातील मोजणीची परिक्षा पास झालो आहे. मी मोजणीदार म्हणून काम केलेले आहे. मी मोजणीदार म्हणून कार्यालयाशिवाय इतर कोठेही परिक्षा दिलेली नाही. मी साधारणपणे शंभर एक प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केलेले आहे. मी नि.दि.दा.क्र.१०७/२०११ यामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून काम केले होते. सदर प्रकरणामध्ये सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ मौजे आनंदव्हाळ या मिळकतीमध्ये वादग्रस्त चौथरा येतो किंवा नाही याची पाहणी करण्याबाबत आदेश होते. मी मोजणीबाबत दि.२०/०३/२०१४ या मोजणीच्या तारखेबाबत दोन्हीही पार्टींना नोटीस काढली होती. मी दि.२०/०३/२०१४ रोजी मोजणीसाठी गेलो होतो. मी मोजणीसाठी माझ्या सोबत प्लेन टेबल, टायटल व मोजणीचे इतर साहित्य नेले होते. मी सर्वे नं.३ हिस्सा नं.१२ याचा नकाशा माझ्या सोबत नेला नव्हता, टिपण नेले होते. मी टिपण स्वतः तयार केलेले होते. मी तयार केलेले टिपण आज रोजी माझ्या सोबत आणलेल्या प्रकरणाच्या फाईलमध्ये नाही. मी घेतलेल्या टिपणामध्ये प्रमाण हे १ :२० असे होते. मी सदरचे टिपण माझ्या कार्यालयाकडून घेवून येवू शकतो. मी कार्यालयातून प्रकरणाची फाईल घेताना तपासून पाहिली नाही. टिपण हे प्रस्तुत प्रकरणात महत्त्वाचे आहे.

[ वादीच्या विधीज्ञांनी टिपण न्यायालयासमक्ष आणल्याशिवाय मोजणी चुकीची कशी आहे हे दाखवता येऊ शकत नाही असे न्यायालयास सांगितले, त्यानुसार टिपण साक्षीदाराने न्यायालयात हजर करे पर्यंत साक्षीदाराचा पुढील सरतपास तहकूब करण्यात येतो.]

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

ठिकाण : मालवण
दिनांक : ०७/११/२०२३

महेश रा. देवकते
सह दिवाणी न्यायाधीश (क-स्तर), मालवण